# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (प.)

**<u>मा. सर्वसाधारण सभा</u>**

**मा.सर्वसाधारण सभा सूचना क्र.१२**

**दि. १५/०९/२०२६**

प्रति,

मा. श्री / श्रीमती ........................................,
नगरसेवक / नगरसेविका,
वसई-विरार शहर महानगरपालिका

महोदय / महोदया,

या सूचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा बुधवार, दि. २३/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता 'सर्वसाधारण सभागृह', ४ था मजला, वसई-विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय, यशवंत नगर, विरार (प.) येथे खालील विषयांवर विचार विनिमय करून निर्णय घेणेसाठी आयोजित करण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेस कृपया उपस्थित रहावे, हि विनंती.

**<u>मा.सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका</u>**

१. मागील दि.३१/०८/२०२६ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव.
२. परिवहन समितीवर प्राप्त अर्जांपैकी पात्र १२ व्यक्तींची परिवहन सदस्य म्हणून नेमणूक करणे.
३. प्रश्नोत्तरे.
४. शासकीय पत्र व्यवहार माहितीस्तव.
५. श्री.संदीप प्रकाश पाटील, अग्निशामक यांच्या सेवा समावेशनाबाबत.
६. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गातील एकूण ४३ कर्मचाऱ्यांचे मूळ नियुक्तीवेळचे विहित मर्यादेपेक्षा अधिक असलेले वय क्षमापित करून, सेवा नियमित करणेबाबत व त्यानुसार अनुज्ञेय लाभ मंजूर करणेबाबत.
७. वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या १) पाणी पुरवठा वितरण व्यवस्था बळकटीकरण व विस्तारीकरणाच्या फेज II, २) खोलसापाडा-१ व २ तसेच ३) तृतीय स्तरीय सांडपाणी प्रकल्प (TTP) उभारणे या प्रकल्पांकरीता तांत्रिक सल्लागाराच्या केलेल्या नेमणूकीस व खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.
८. वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील पश्चिम पट्ट्यातील गावांमध्ये विकेंद्रित (Pocket STP/Decentralized STP) सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणीसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याकरीता तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.
९. स्वच्छ भारत अभियान (नागरी) 2.0 या योजने अंतर्गत क्षमता बांधणी (CB) या घटकांतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिकेचे लोकप्रतिनिधी, अधिकारी/ कर्मचारी, सफाई कामगार, कचरा वेचक तसेच घाऊक कचरा निर्माते (BWG), सामाजिक संस्था, स्वयं सहायता बचतगट व शैक्षणिक संस्था यांना घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ ची अंमलबजावणी करणेच्या अनुषंगाने विविध प्रशिक्षण व अभ्यास दौऱ्याचे (Exposure Visit) आयोजन करणेसाठी मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, नाशिक AIILSG या संस्थेची Skill Knowledge Partner (SKP) म्हणून नियुक्ती करणेबाबत.
१०. वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील इमारती, स्वतंत्र घरे व चाळींना मलनिःस्सारण (Sewerage Property Connection) जोडणी शुल्क निश्चित करण्यास मान्यता मिळणेबाबत.

११.वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत रुग्णालयांमध्ये MJPJAY या योजने अंतर्गत दाखल रुग्णांना मोफत भोजन व अल्पोपहार सुविधा उपलब्ध करून मिळणेकरीता सन २०२६-२०२७ या वर्षाकरीता ई-निविदा मागविणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

१२.सन २०२६-२७, २०२७-२८ व २०२८-२९ या वित्तीय वर्षात महानगरपालिका क्षेत्रात आवश्यकतेनुसार विविध व्यासाच्या जलवाहिन्या अंथरणे कामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

१३.वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अधिकारी /कर्मचारी यांच्या नव्याने तयार करणेत आलेल्या आकृतीबंधाला मंजुरी मिळणेबाबत. (दि.१७/०७/२०२६ व दि.३१/०८/२०२६ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेतील स्थगित विषय)

१४.महानगरपालिकेच्या लिपिक टंकलेखक, कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी, विद्युत, स्थापत्य, Software, Hardware व Network), आरोग्य निरीक्षक, अग्निशमन विमोचक (Fire Man), कॉम्पुटर तंत्रज्ञ, विधी अधिकारी, सहाय्यक विधी अधिकारी, आरेखक, सर्वेअर, ट्रेजरर, ग्रंथपाल, सहाय्यक ग्रंथपाल, उद्यान निरीक्षक, सहाय्यक उद्यान अधीक्षक, दूरध्वनी चालक, कक्ष सेवा, कक्ष सेविका, लघु टंकलेखक, अर्धकुशल मनुष्यबळ, वाहन चालक, प्रमुख माळी, तारतंत्री, मजूर, सफाई कामगार, शिपाई इत्यादी संवर्गातील पदे कंत्राटी पद्धती ऐवजी ठोक वेतनावर नियुक्त करणेबाबत. (दि.३१/०८/२०२६ रोजीची मा.सर्वसाधारण सभा, पूरक घोषणेतील स्थगित विषय)

१५.वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातील रु.९५७.६४ कोटींच्या संशयास्पद निविदा प्रक्रियेची सखोल चौकशी करून ती रद्द करण्याबाबत. (दि.३१/०८/२०२६ रोजीची मा.सर्वसाधारण सभा, पूरक घोषणेतील स्थगित विषय)

१६.वसई-विरार शहर महानगरपालिका रुग्णालयामध्ये सरकारी खाजगी भागीदारी (PPP Model) तत्वावर केमोथेरेपी विभाग सुरु करणेकामी अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) व्दारे प्रस्ताव मागविणेंस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.

आपला विशासू,

(विश्वनाथ तळेकर)
महानगरपालिका सचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका

(मा.महापौर महोदय यांच्या मान्यतेने)